बीड - महाराष्ट्र • सोमवार दि. 19 ते 25 मार्च 2025 • वर्ष 1 ले • अंक 45 • पाने 4 • टीसी-एमए एच आर - 52678 | किंमत 2 रुपये
Beed - MAHARASHTRA • Monday 19 to 25 January 2025 • Year 1 • ISSU 45 • Page 4 • TC-MAHMAR - 52678 | Pirce 2 रुपये

साप्ताहिक दिव्य
@वास्तव
संपादक - सचिन पवार




# पोलीस व गृहखात निष्क्रिय म्हणूनच गुंडगिरीचा माज ?

## बीड जिल्ह्यात गुंडगिरी काबोकाळी ; पोलीस प्रशासन करतय काय ?





» बीड | प्रतिनिधी

कुठेही गुंडगिरी झाली तरी बिहार झाला आहे असं बोललं जातं परंतु हे बोलण्या अगोदर ग्रह खाता आणि पोलीस करतात काय असा प्रश्न उपस्थित होतो. कारण की पोलीस आणि ग्रह खात्यातील सर्व अधिकाऱ्यांना शासन पगार देत आहे मग ते पगारासारखं काम करत का नाहीत असा सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न पडला आहे. पोलीस आणि गृह खात्यातील अधिकाऱ्यांना शासन पगार देत असेल तर ते हे गुंडगिरी का संपवत नाहीत. का त्यांनाच गुंडगिरी वाढवायची आहे असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

बीड जिल्ह्यामध्ये सध्या गुंडगिरीचं राज्य आहे असं दिसत आहे. मग पोलीस आणि ग्रह खात्याचे अधिकारी करतात काय ? त्यांना पगार मिळतो कशाचा ? का फक्त नावालाच पोलीस आणि ग्रह खात आहे ? बीड जिल्ह्यामध्ये गुंडगिरी दिवसाढवळ्या व्हिडिओ शूट करून सोशल मीडियावर व्हायरल होत असताना पोलीस त्यावर कसलीच कारवाई करत नाहीत. कुणी तक्रार घेऊन आला तर तक्रार घेत नाही मग यांना पगार द्यायचा तरी कशाचा ? असा सर्वसामान्य जनतेतून सूर निघत आहे. बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासन नेत्यांच्या इशाऱ्यावर चालतं असं दिसत आहे. मग सर्वसामान्य नागरिकांनी न्याय कुणाकडे मागायचा. बिहार पेक्षा बेकार परिस्थिती बीड जिल्ह्याची झाली आहे. इतकी गुंडगिरी जी स्वतः व्हिडिओ शूट करून सोशल मीडियावर सोडते तरीदेखील पोलीस त्यांच्यावर तक्रार आल्याशिवाय कारवाई करत नाहीत इतकी काय लाचारी पोलिसांनी स्वीकारले आहे असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

### सोशल मीडियावर दहशत माजवणाऱ्या वर मकोका ?

■ सोशल मीडियाचा उपयोग सध्या दहशत माजवण्यासाठी होताना दिसत आहे. सोशल मीडियावर दहशत माजवणाऱ्या पोस्ट आणि व्हिडिओ टाकून व्हायरल करणाऱ्या वर मकोका अंतर्गत कारवाई केलीच पाहिजे असा काहीतरी नवीन पोलीस आणि ग्रह खात्याने कायदा करून मोठे पाऊल उचललं पाहिजे जेणेकरून अशी दहशत सोशल मीडियाच्या माध्यमातून माजवून जनतेत भीतीच वातावरण निर्माण होणार नाही..

### पोलीस आणि गृहखात स्वतःची जबाबदारी विसरले का ?

■ बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासन आणि महाराष्ट्राचे गृहखात हे बीड जिल्ह्यासाठी स्वतःची जबाबदारी विसरले आहेत की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. बीड जिल्ह्यामध्ये त्यांची जबाबदारी काय असं त्यांना माहितीच आहे की नाही असं सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या दहशतीच्या व्हिडिओवरून दिसत आहे. उघडपणे एखाद्या व्यक्तीला मारतानाची व्हिडिओ व्हायरल करून दहशत माजवली जाते पण पोलीस प्रशासन आणि गृहखात त्या संदर्भात कसलीच खबरदारी घेत नाही किंवा त्यांच्यावर कसलीच कारवाई करत नाही का तर तक्रार नाही मग तक्रार आली तरच दहशत संपवायची अन्यथा दहशत माजवून द्यायची असंच म्हणायचं की काय ? इतकी ही निष्क्रिय प्रशासन व्यवस्था देशात बीड जिल्ह्यात प्रथमच दिसत आहे.

### ! वास्तव काव्य !

**" मिशन सिंदूर "**

ऑपरेशन सिंदूर राबवत
पाकड्यांना शिकवला धडा
त्यांच्या पापांचा सारा
भरला होता घडा.

वारंवार नका करू
तसल्या पुळचट कुरघोडी
नसता पुन्हा करू
पळता भुई थोडी.

आम्ही संयम ठेवला तरी
तुमचे चिडीचे डाव,
कसा काय घातला मग
आम्ही मानगुटीवर घाव.

हवेतील ड्रोन हल्ले
त्यांचे हवेतच विरले,
आपल्या बहादूर सैन्यांनी
अचूक नेम धरले.

सर्व सैन्य दलांनी
घेतले अमाप कष्ट,
नऊ दहशतवादी अड्डे
केले बरं का नष्ट.

भारतीय शूर वीरांनो
सदैव तुमचा गर्व,
क्षणोक्षणी आहोत आम्ही
तुमच्या सोबत सर्व!
तुमच्या सोबत सर्व!!



- श्री.संजय शेळके
पांढरी ता.आष्टी जि.बीड.
मो.9975228585

# जुळ्या बहिणींचे जुळे गुण!

## दहावीमध्ये मिळवले सेम टू सेम 96 टक्के, अनुष्का-तनुष्काचे दैदिप्यमान यश



» बीड | प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल (१३ मे) रोजी जाहीर झाला. या वर्षीही राज्यात मुलींनीच बाजी मारली आहे. बीडमध्ये जुळ्या बहिणींनाही समे टू सेम गुण मिळाले आहेत.

बीडच्या आष्टी येथील अनुष्का आणि तनुष्का या जुळ्या बहिणींनी दहावीच्या परीक्षेत चक्क गुण पण सेम टू सेम मिळवले आहे. ९६ टक्के गुण मिळाल्याने या जुळ्या बहिणींची चांगलीच चर्चा होत आहे.आष्टी येथील अनुष्का आणि तनुष्का देशपांडे या दोघी जुळ्या बहिणी आहेत. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर गुणाच्या बाबतीत अनेक बातम्या ऐकल्या असतील. मात्र आता जुळ्या बहिणींनी जुळे गुण मिळाल्याचे समोर आले आहे. आष्टी शहरातील दत्त मंदिर परिसरात राहणाऱ्या धीरज देशपांडे यांच्या दोन जुळ्या मुलींनी कमाल केली. विशेष म्हणजे दोघींना नृत्याची आवड आहे. त्यामध्ये दोघी हुबेहूब नृत्य करतात. दहावीला सोबत अभ्यास केला शाळेतही सोबत जायच्या. पण वाटलं नव्हतं दोघींना एक सारखेच गुण पडतील. निकाल लागल्यानंतर खूप आनंद झाला. आम्ही दोघी एकमेकींच्या शंका निरसन करायचं त्यामुळेच चांगले गुण पडले असं अनुष्का हिने सांगितले.

### दहावीचा निकाल ९४.१० टक्के

■ **या वर्षीदहावीचाराज्याचा निकाल ९४.१० टक्के एवढा लागला आहे. तर कोकण विभागाने पहिला नंबर घेतला असून कोकण विभागाचा ९९.८२ टक्के एवढा निकाल लागला आहे. या वर्षी दहावीच्या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यापैकी १४,५५,४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.**

# पाटोदा आगाराला नवीन पाच बसेस उपलब्ध!

» पाटोदा | प्रतिनिधी



महाराष्ट्रातील सर्व तालुक्याला नविन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.परंतु पाटोदा तालुक्याच्या वाटेल्या एक ही बस देण्यात आली नव्हती. यासाठी मराठी पत्रकार परिषदच्या वतीने पाटोदा आगाराला नविन बसेस देण्याची मागणी करण्यात आली होती.यासाठी पाटोदा येथील आमदार सुरेश धस यांच्या जनता दरबारात मागणी केली होती.याची दखल घेत आमदार सुरेश धस यांनी परिवहन मंत्री यांच्या निर्देशनास ही मागणी आणुन मंजुरी मिळवली. आ. सुरेश धस यांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधल्यानंतर अखेर एसटी महामंडळाने तातडीने हालचाली सुरू केल्या. पाटोदा आगारासाठी अत्याधुनिक अशा पाच नवीन बीएस-६ गाड्या आज गुरुवारी (१५ मे) रात्री आगारात दाखल झाल्या.. महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील अनेक एसटी आगारांना नवीन बस मिळाल्या असताना, पाटोदा आगारांकडे सतत दुर्लक्ष होत होते. या प्रकरणी सतत पाठपुरावा करत जनता दरबारात एसटी महामंडळाच्या निष्क्रीय कारभाराचा पाढा वाचला होता. आमदार सुरेश धस यांनीही विभागीय नियंत्रकांची थेट संपर्क साधून मराठी पत्रकार परिषदच्या मागण्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्याची सुचना केली होती.त्यानुसार पाटोदा आगाराला नवीन गाड्यांची मागणी केली करण्यात आली होती.

# गुंडगिरीचा बिमोड करू : मनोज जरांगेंचा निर्धार

## पालकमंत्री अजित पवार यांची बीड जिल्ह्यावर पकड नाही, त्यामुळेच गुंडगिरी वारली



» अंबाजोगाई | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गुंडगिरीच्या माध्यमातून हल्ले होतच राहणार. आम्ही काय नुसत्या भेटीचं देत फिरायच का? पालकमंत्री अजित पवार यांची बीड जिल्ह्यावर पकड राहिली नाही, त्यामुळेच गुंडगिरी वाढत चालली आहे. ही गुंडगिरी निर्माण झालेले विदारक वातावरण दूर करण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेणार आहोत, असे वक्तव्य मराठा आरक्षणाचे प्रणेते मनोज जरांगे पाटील यांनी केले. परळी तालुक्यातील लिंबोटा येथील युवक शिवराज दिवटे याला गुंडांकडून बेदम मारहाण करण्यात आली. शिवराज याच्यावर सध्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रविवारी(दि.18) दुपारी मनोज जरांगे पाटील यांनी शिवराजची भेट घेतली आणि त्याची आस्थेवाईक पणे चौकशी केली. यानंतर जरांगे पाटील माध्यमांशी बोलत होते. यावेळी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, शिवराजच्या अंगावरील मारहाणीचे वळ पाहून अंगावर काटा येतो. सामूहिक कट रचून त्याला जीवे मारण्यासाठीच त्याचे अपहरण केले, मात्र लोक धावून आल्याने त्याचा जीव वाचला. अशा घटना वारंवार घडूनही सरकार काहीच करत नाही. किती दिवस आम्ही तरी शांत रहायचे? ही वाढती गुंडगिरी रोखण्यासाठी आपण पुढाकार घेणार आहोत. बीड जिल्यातील सर्व घराणे व सामाजिक क्षेत्रातील लोकांशी चर्चा करुन पुढचे पाऊल उचलण्याची वेळ आली आहे. गुंडांचा माज उतरवणार.

### चौकशीच्या फेऱ्यात येऊ नका...

■ **शिवराज याला मोठा मार लागला आहे, तो गंभीर जखमी आहे, तरीही डॉक्टर लोक सांगतात त्याला केवळ मुक्का मार आहे. आरोपीला वाचविण्यासाठी जर कोणावर दबाव येत असेल तर घाबरू नका? तुम्ही विनाकारण चौकशीच्या फेऱ्यात अडकाल, असा इशाराही त्यांनी वैद्यकीय प्रशासनाला दिला.**

# तुकोबांच्या पालखी रथासाठी व चौघडा गाडी ओढण्यासाठी संस्थान करणार बैल खरेदी

## पालखी रथाला बैलजोडी निवड करून जुंपण्याची प्रचलीत प्रथा बदलणार




» देहूगाव : वृत्तांत

श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी रथाला व चौघडा गाडीसाठी जुंपण्यासाठी प्रथमच श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने स्वत: बैलजोडींची खरेदी करणार असल्याचे रविवारी (ता. १८) प्रसिध्दी द्वारे जाहीर केले आहे. त्यामुळे प्रचलित बैलजोडी निवड प्रक्रीया व रथाला बैलजोडी जुंपण्याचा मिळणारा मान ही प्रचलित प्रथा यंदा प्रथमच बदलली जाणार आहे. मात्र या मुळे भाविक शेतकरी व बैलजोडी मालक दुखावले जाणार आहेत.

बुधवार दि. १८ जुन रोजी श्री संत तुकाराम महाराजांचा पायी पालखी सोहळा पंढरपूरकडे श्री क्षेत्र देहूगाव येथून प्रस्थान ठेवणार आहे. या पार्श्वभूमीवर श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने पालखी सोहळ्याची तयारी सुरू झाली आहे. यातील एक भाग बैलजोडी निवड करणे व संबधीत बैलजोडीला श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी रथ ओढण्याचा मान देणे हा होता. यंदा संस्थानच्या नवनिर्वाचित पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त मंडळाने प्रथमच संस्थानच्या वतीने बैलजोडी खरेदी करून त्यांनाच रथाला जुंपण्यात येणार असल्याचा निर्णय घेतला आहे.

### हा आश्चर्यकारक व ऐतिहासिक बदल

**▪ यामुळे जिल्ह्यातील परिसरातील श्री संत तुकाराम महाराजांवर श्रध्दा ठेवणारे शेतकरी व भाविक नाराज होणार आहेत. पालखी रथाला बैलजोडी जुंपण्याचा मान मिळणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने भाग्याचे होते. मात्र ती संधी यंदा मिळणार नाही. या बाबत श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष व पालखी सोहळा प्रमुख यांच्या सहीन प्रसिध्दीपत्रक जाहीर करण्यात आले आहे. यामुळे यंदा पालखीरथासाठी बैलजोडी निवड प्रक्रीया होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.**

# दादा परळीला इमानदारीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची गरज !

» परळी / प्रतिनिधी

परळी शहराच्या सामाजिक, नागरी व प्रशासकीय व्यवस्थेचा विचार करता, सध्या अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की येथील जनतेला केवळ सरकारी योजना, कागदावरील घोषणा आणि बैठकींमध्येच दाखवला जाणारा विकास नको असून, प्रत्यक्ष कृती करणाऱ्या, इमानदारीने जबाबदारी स्वीकारणाऱ्या आणि कोणत्याही राजकीय दबावाशिवाय जनहिताचे निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांची नितांत गरज आहे, हे आता स्पष्ट होत आहे.

परळी शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून काही अधिकारी व कर्मचारी येथेच चिटकून बसले असून, तेच विशिष्ट साखळीने प्रशासन चालवत आहेत, अशी स्पष्ट भावना शहरात उमटू लागली आहे. विकासाच्या नावे फक्त मलिदा खाल्ला जातोय असेही नागरिक बोलत आहेत, आणि जबाबदारी मात्र कोणीही स्वीकारायला तयार नाही. नागरिकांचे म्हणणे आहे की, जे अधिकारी परळीला बदनाम करत आहेत, तेच आपल्या हप्तेखोरी, बिनधास्त अरेरावी आणि वरदहस्ताच्या बळावर जनतेच्या अधिकारांवर डल्ला मारत आहेत, अशा अधिकाऱ्यांना तत्काळ इतर जिल्ह्यांत पाठवावे अशीही विरोधक आणि नागरिक करत आहेत. गावपातळीवरील योजना असोत, ग्रामपंचायत वा पंचायत समितीच्या योजना असोत, घरकुल वाटप असो वा अन्य निधीच्या योजना, सगळीकडे 'हातसफाई' सुरू असून, अनेक सामान्य नागरिकांनी स्वतःच्या अनुभवांवरून सांगितले की, कोणतीही योजना त्यांच्या पर्यंत सहजासहजी हातात काही तरी दिल्याशिवाय पोहोचत नाही, त्याशिवाय फाईलही पुढे सरकत नाही. नगरपालिका प्रशासन पूर्णपणे विस्कळीत असून, सफाई विभाग हे केवळ नावापुरतेच काम करत आहेत.

# अवकाळी वादळी वाऱ्यासह पावसामुळे सौर पंपाचे मोठे नुकसान

» कुसळंब | प्रतिनिधी

अचानक झालेल्या अवकाळी पावसासोबत आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील कुसळंब परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

कुसळंब शिवारातील अनेक शेतकऱ्यांनी सौर पंप बसवले आहे. 16 17 तारखेला झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसात सौर पंपाच्या प्लेट्स या वादळी वाऱ्यामुळे तुटून गेल्या आहेत. परिणामी त्यांचे सौर ऊर्जा आधारित सिंचनाचे साधन निकामी झाले असून मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून प्रशासनाने पंचनाम्याची कारवाई करून तात्काळ मदतीची कार्यवाही करावी, अशी मागणी स्थानिक शेतकरी वर्गातून केली जात आहे.वादळी वाऱ्यामुळे परिसरातील अन्य शेतकऱ्यांच्या पिकांनाही काही प्रमाणात नुकसान झाल्याचे समजते. हवामानातील अचानक बदलामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.






# मंगल कार्यालयात दागिणे चोरणारी टोळी सक्रीय !

## महिनाभरात तीनहून अधिक घटना ; पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची गरज

» आष्टी | प्रतिनिधी



आष्टी शहर व परिसरातील मंगल कार्यालयांमध्ये आयोजित विवाह सोहळ्यात गेल्या काही दिवसांपासून किमती दागिने चोरणारी टोळी सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. वऱ्हाडी मंडळी लग्नकार्यात व्यस्त असल्याची संधी साधून चोरटे सोन्याचे दागिने व रोख रकमा लंपास करू लागले आहेत. आष्टी ठाण्यात या प्रकरणी महिनाभरात तीन ते चार घटना घडल्या आहेत. दि.१४ मे रोजी दुपारी आणखी अशाच प्रकारची घटना घडली आहे. लग्नात वधूसाठी खरेदी केलेले एक लाख ५९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे विविध दागिने चोरट्यांनी हातोहात लंपास केले.

वारंवार घटणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांमुळे मंगल कार्यालयात दागिने चोरणाऱ्या चोरट्यांची टोळी सक्रिय झाल्याची चर्चा होऊ लागली आहे. आष्टी पोलिसांनी घडलेल्या घटना लक्षात घेता दागिणेचोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.याबाबत महेश किसन पवार (रा. कुसळंब ता. पाटोदा) यांनी १५ मे रोजी आष्टी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यांचे भाऊ गोविंद पवार यांचा १४ मे रोजी आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालयात विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता.लग्नात वधूला घालण्यासाठी पवार कुटुंबियांनी सोन्याचे दागिने खरेदी केले होते. मात्र लग्न लागण्याच्या मुहूर्तावर ते दागिने दुपारी पावणेएकच्या सुमारास अज्ञातांनी चोरून नेले. यामध्ये २३ हजार रुपये किमतीचा एक झुंबर जोड, २५ हजार रुपये किमतीचे मिनी गंठण, ९० हजार रुपयांचे साखळी गंठण, १६ हजार ५०० रुपये किमतीचे मण्यांचे गंठण व चार हजार ५०० रुपये किमतीची एक अंगठी असे एकूण एक लाख ५९ हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी मंगल कार्यालयातून लंपास केले.

# अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम

बीड प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार उद्या सोमवार, दि. 19 मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे. सकाळी 8:05 वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 8:15 वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. 8:15 वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 9:00 वाजता शासकीय विश्रामगृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी 9.00 वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 10.30 वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी 10.30 वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 11.30 वाजता श्री. राजकिशोर मोदी यांचे निवासस्थान.

# ड्रग्ज तस्करांना दणका !

## कोटींचे एमडी जप्त; मुंबई आणि नवी मुंबईतील पाच जणांना अटक

**मुंबई पोलिसांनी एका ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश केला. पोलिसांनी तब्बल १३ कोटींचे एमडी मादक पदार्थ जप्त**




» मुंबई : वृत्तांत

एका मोठ्या ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश करण्यात मुंबई पोलिसांना यश आले. मुंबई पोलिसांनी या प्रकरणात पाच जणांना अटक केली आहे. पोलिसांनी ड्रग्जही जप्त केले असून, त्याची बाजाराभावानुसार १३ कोटी किंमत आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोण-कोण आहे, याचा शोध पोलीस घेत असून, आरोपींची चौकशी सुरू केली आहे. मुंबईमध्ये मार्च महिन्यात मुंबई पोलिसांनी एका आरोपीला ड्रग्जसह पकडले आणि अटक केली. त्याच्या ४.५ लाखांचे एमडी नावाचे ड्रग्ज सापडले होते. एका अधिकाऱ्याने सांगितले की, अटक केल्यानंतर आरोपीची चौकशी करण्यात आली. आरोपीने त्यांच्या सहकाऱ्यांची नावे चौकशीत उघड केली. त्याच माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकून पाच आरोपींना अटक केली.

### दक्षिण मुंबईत पोलिसांनी टाकली धाड

**▪ मुंबई पोलीस दलातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, झोन ६ च्या अँटी नार्कोटिक्स सेल, आरसीएफ पोलीस, दहशतवाद विरोधी पथक यांच्या संयुक्त विद्यमाने दक्षिण मुंबईतील एका ठिकाणी धाड टाकण्यात आली. तिथे ६.६ किलो एमडी या ड्रग्जचा साठा जप्त करण्यात आला. त्याची किंमत १३ कोटी रुपये आहे. आरोपींविरोधात एनडीपीएस कायद्यातील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. या रॅकेट मध्ये आणखी कोण आहेत, याचाही तपास पोलीस करत आहे. यापूर्वी फेब्रुवारीमध्ये नवी मुंबईमध्ये २०० कोटींचे ड्रग्ज जप्त करण्यात आले होते.**

# एस.एम.देशमुख यांनी पत्रकारांसंबंधीत मांडलेल्या प्रश्नांचा शासन दरबारी पाठपुरावा करणार : मंत्री नितेश राणे

## सिंधुदुर्ग येथे आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना मराठी पत्रकार परिषेदेच्या वतीने करण्यात आले अभिवादन

» सिंधुदुर्ग | वृत्तांत

'मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी पत्रकारांसंबंधीत विविध प्रश्न, समस्या आज या अभिवादन सभेत मांडले आहेत. पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र सरकार नेहमीच प्रयत्नशील असते. यापुढेही यासाठी आवश्यक असणारा पाठपुरावा नक्की केला जाईल,' अशी ग्वाही राज्याचे मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दिली.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघ आयोजित दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर अभिवादन सभा आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर स्मारक व पत्रकार भवन, सिंधुदुर्गनगरी येथे पार पडली. या कार्यक्रमात मंत्री राणे बोलत होते.याप्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी महिला अध्यक्ष शोभा जयपूरकर, सह प्रसिद्धी प्रमूख भारत निगडे, डिझिटल मीडिया परिषेदेचे अनिल वाघमारे, सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघ अध्यक्ष उमेश तोरस्कर, परिषेदेचे माजी अध्यक्ष गजानन नाईक यांच्यासह राज्यभरातून आलेले पदाधिकारी उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना मंत्री नितेश राणे म्हणाले, 'बदलत्या काळानुसार पत्रकारिता बदलत चाललेली आहे. पत्रकाराने पत्रकारिता करताना नैतिकता पाळणे तितकेच महत्त्वाचे आहे. आगामी काळात एआय सारख्या तंत्रज्ञानाचा देखील समावेश पत्रकारितेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्या दृष्टीने ही पत्रकारांनी स्वतः मध्ये बदल करणे गरजेचे आहे.'पालकमंत्री नितेश राणे यांनी यावेळी मराठी पत्रकार परिषदेच्या कामाचे कौतुक केले. ते म्हणाले, 'मराठी पत्रकार परिषद ही सर्वात जुनी असणारी संस्था असून येथे आज संपूर्ण महाराष्ट्रातून पत्रकार आले आहेत. यावरूनच या परिषदेचे महत्त्व अधोरेखित होत आहे. आगामी काळात परिषदेला शासकीय पातळीवर आवश्यक असणारी मदत करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जातील,'

असेही त्यांनी सांगितले.याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी सांगितले की, 'आज आपण एका महापुरुषाच्या भूमीमध्ये वंदन करण्यासाठी आलेलो आहोत. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांची जन्मभूमी असणाऱ्या जिल्ह्यामध्ये येऊन अभिवादन करण्यासारखी भाग्याची दुसरी कोणतीही गोष्ट नाही. आज हे भाग्य आपल्या सर्वांना लाभले आहे. आज या ठिकाणी अहिल्यानगर, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, बीड, नाशिक, धुळे, जळगाव, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर अशा राज्याच्या विविध भागातून पत्रकार आलेले आहेत. खरंतर कोकणची भूमी ही महापुरुषांची भूमी आहे. येथेच बाबुराव पराडकर यांच्यासारखे हिंदी भाषेत आपलं वर्चस्व स्थापित करणारे पत्रकार घडले आहेत. त्यामुळे बाबुराव पराडकर यांचे ही स्मारक पराड येथे व्हावे, अशी आमच्या संघटनेची मागणी आहे.'यावेळी एस.एम.देशमुख यांनी पत्रकारांचे प्रश्न व त्यांना येणाऱ्या अडचणी सविस्तरपणे मांडतानाच त्या सोडवण्यासाठी शासकीय पातळीवर पाठपुरावा करण्याची मागणी ही राणे यांच्याकडे केली.जिल्हाधिकारी अनिल पाटील, परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सिंधुदुर्ग पत्रकार जिल्हा संघाचे अध्यक्ष उमेश तोरस्कर, जिल्हा माहिती अधिकारी चिलवणकर यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिषदेचे माजी अध्यक्ष गजानन नाईक यांनी तर सूत्रसंचालन गणेश जेठे यांनी केले.



### आमदार निलेश राणे व दीपक केसरकर यांनी दिल्या शुभेच्छा

**▪ मराठी पत्रकार परिषदेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात शिवसेनेचे आमदार दीपक केसरकर हे दूरध्वनीद्वारे सहभागी झाले होते. त्यांनी सर्व पत्रकारांचे स्वागत करताना सांगितले की, 'पत्रकारांना आवश्यक असणारे सहकार्य करण्यासाठी सरकार नेहमीच पुढे राहील. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर हे आमच्या जिल्ह्यातील होते, याचा आम्हाला अभिमान आहे.' तर आमदार नितेश राणे यांनी कार्यक्रमस्थळी भेट देत आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करतानाच सांगितले की, 'देशाचे भविष्य हे पत्रकारितेवर अवलंबून आहे. आताची पत्रकारिता महत्त्वाच्या वळणावर आहे.**

### परिषद कार्यकारणीची झाली बैठक

**▪ अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यकारणीची बैठक यावेळी पार पडले. या बैठकीत परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. तर बैठकीमध्ये सह राज्य प्रसिद्धीप्रमुख भारत निगडे, मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके, पुणे अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरीश पाटणे, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत नेटके यांनीही बैठकीत विविध प्रश्न मांडले.**

# पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारत देशाशी लढण्याचे स्वप्न बघू नये : आमदार सुरेश धस

## प्रचंड शौर्य तिरंगा यात्रेने आष्टीकरांचे लक्ष वेधले

» आष्टी | प्रतिनिधी

पाकिस्तान आतंकी स्थान झाला आहे.. पाकिस्तानचे सैन्यदल हतबल झाले आहे मोठ्या मोठ्या वल्गना करणारे.." अगर पाणी बंद कर देंगे तो खून की नदिया बहेंगी " म्हणणारे पाकिस्तान मंत्रिमंडळ बंकर मध्ये लपून बसले.संपूर्ण जगासमोर पाकिस्तानची नाचक्की झाली आहे..पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारताशी लढण्याचा विचार ही करू नये..

" अब नरेंद्र मोदी का नया भारत है.. देश मोदी जी के साथ है, और देश सेना के साथ है असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले. आष्टी येथे त्यांनी आयोजित केलेल्या..शौर्य तिरंगा यात्रेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर श्रीमती भाकरे श्रीमती काकडे श्रीमती कमल सोंडगे श्रीमती रत्नमाला वाल्हेकर श्रीमती अरुणा नागरगोजे श्रीमती भाग्यश्री राख श्रीमती सीताबाई राख श्रीमती सीताबाई गायकवाड श्रीमती तावरे या केवळ वीर पत्नी वीरमाता यांची उपस्थिती होती प्रमुख उपस्थितांमध्ये सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे उत्तम बोडखे, शरद रेडेकर, सुनील रेडेकर, बद्रीनाथ जगताप,सुरेश उगलमुगले,भागवत येवले, यशवंत खंडागळे दीपक निकाळजे राजू जाधव, संजय गाढवे,आदि उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीस त्रिजल माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी श्री.अंकुशखोटे यांनी स्वर्गीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची..

" ये भारत कोई भूमिका टुकडा नही, ये वंदन की धरती है अभिनंदन की भूमी है.. ही कविता ऐकवली.. सेवानिवृत्त मेजर श्री.भोसले यांनी प्रास्ताविक केले.. या संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रेचे सूत्रसंचालन सूत्र बाळासाहेब तळेकर यांनी केले..पुढे बोलताना आ.सुरेश धस म्हणाले, २२ एप्रिल रोजी काश्मीर मधील पहलगाम परिसरातील बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटनाला गेलेल्या भारतीय नागरिकांना विशेषतः पुरुषांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालून मारण्यात आले..

कुटुंबीयां देखत, पत्नी समोर ,मुलाबाळांवर समोर..विशेषतः केवळ पुरुषांना क्रूर पद्धतीने गोळ्या घालून मारण्यात आले ही अत्यंत अमानवी कृती होती त्यामुळे या पाकिस्तान पुरस्कृत आतंकवाद्यांना आणि पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी अत्यंत विचारपूर्वक योजना आखून पाकिस्तानला धडा शिकवला आहे दि.६ मे च्या रात्री

अगोदर पहिल्या दिवशी शंभर ते दीडशे दहशतवाद्यांना कंठस्नान घालून दुसऱ्या दिवशी दि.७ मे रोजी केवळ २३ मिनिटांमध्ये पाकिस्तानातील प्रमुख नऊ हवाई तळ उध्वस्त करून भारतीय सैन्याने पराक्रमाची गाथा लिहिली आहे..अफगाणिस्तान,अरब अमिराती, या मुस्लिम राष्ट्रांनी आणि दोन तीन देश वगळता.. संपूर्ण जगाने भारताला पाठिंबा दिला आहे.. पाकिस्तानला केवळ तुर्की आणि अझरबैझान या भिकारी राष्ट्रांनी पाठिंबा दिला आहे..भारतावर यापूर्वी दहशतवादी हल्ले झाले ..२६/११ हा भारत देशावरील हल्ला होता, मुंबई शहरात बॉम्ब स्फोट झाले शेकडो नागरिक मारले गेले.. परंतु तात्कालीन भारतीय पंतप्रधानांकडून केवळ निषेध व्यक्त झाला.. पाकिस्तानला चोख उत्तर देण्यात आले नव्हते..परंतु आता भारत बदललेला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्य दलाला सूट दिलेली आहे मोकळीक दिलेली आहे काही दिवसांपूर्वी याच तुर्कस्तानमध्ये भूकंप झाला असता त्यावेळी त्यांना वैद्यकीय मदत देणारा पंतप्रधान मोदींचा भारत देश हाच सर्वात पुढे होता मात्र तुर्की देशाने या मदतीची उपकाराची परतफेड अपकाराने केली असून पाकिस्तानला मदत केली आहे.






पाकिस्तान कडे शस्त्र नाहीत शस्त्र घ्यायला पैसे नाहीत प्रचंड कर्जबाजारी असल्यामुळे आज पाकिस्तानात महागाईने कहर केला असून जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी हजारो रुपये मोजावे लागत आहेत पाकिस्तानचे सैन्यदल देखील सैन्यदल राहिले नसून ते अतिरेकी झाले आहेत सैन्यदल आणि अतिरेकी यांच्यात काहीही बदल राहिलेला नाही ...असे सांगत भारतीय जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही शौर्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे आणि यामध्ये मतदारसंघातील हुतात्मा झालेल्या वीर सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे असे सांगितले. या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेले त्रिदल माजी सैनिक संघटना, नागरिक, व्यापारी, विद्यार्थी विद्यार्थिनी ,यांचे त्यांनी मनापासून आभार मानले आष्टीच्या पंचायत समिती येथील हुतात्मा स्मारकापासून हुतात्मा जवानांच्या वीर पत्नी वीर माता यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारत मातीची प्रतिमा असलेला अश्वारूढ रथ लक्ष आकर्षण घेत होता बँड पथकाच्या निनादात देशभक्तीच्या " नया भारत का जलवा देखा, पाकिस्तान ने मलबा देखा,"

# खेळण्याच्या वयातच मातृत्व !

## बीड जिल्ह्यात बालविवाह झालेल्या 15 वर्षाच्या दहा मुली गर्भवती

## अवघ्या 13 व्या वर्षी हात पिवळे ; खेळण्याच्या वयातच मातृत्वाचे ओझे

» बीड | प्रतिनिधी

जिल्ह्यातील बालविवाह काही केल्या थांबत नसल्याचे उघड झाले आहे. अगदी शिक्षण, खेळण्याच्या वयातच पालक मुलींचे हात पिवळे करत असल्याने अवघ्या १५ व्या वर्षीही मुली गर्भवती राहत आहेत. मागील वर्षात १८ वर्षांखालील १२ मुली गर्भवती असून, त्यातील १० जणी १५ वर्षांच्या आहेत. याची आरोग्य विभागात नोंद झाल्याने ही गंभीर समस्या उघड झाली आहे. ही परिस्थिती राज्यभरातच आहे, परंतु प्रशासन अहवाल समोर आणत नाही.

बालविवाहासंदर्भात जनजागृतीसाठी शासन कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करते. तसेच बालविवाह रोखण्यासह झालेल्यांवर बालविवाह प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले जातात. परंतु, असे असले तरी बीडमधील ही गंभीर समस्या काही केल्या कमी होत नसल्याचे दिसते. पालक अजूनही आपल्या मुलींचे हात अवघ्या १३ व्या वर्षीही पिवळे करत असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळेच खेळण्याच्या वयातच त्यांच्यावर मातृत्वाचे ओझे पडत आहे. विशेष म्हणजे याची शासनदरबारी नोंद होत आहे.

### ११ मुलींची प्रसूती

**■ जिल्हा रुग्णालयात १३ ते १७ वर्षांतील ११ मुलींची प्रसूतीही झाली आहे. यातील काही मुली या अत्याचार पीडित असल्याचे सांगण्यात आले. पोर्टलला नोंद गर्भवती महिलांची नोंद ही आरसीएच (प्रजनन व बाल आरोग्य) पोर्टलवर केली जाते. यावरूनच अगदी १५ वर्षांच्या मुली गर्भवती असल्याचे उघड झाले आहे. हे आरोग्य विभागाचे अधिकृत पोर्टल आहे.**

### कुठल्या आहेत गर्भवती मुली

**■ एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत १२ मुलींची गर्भवती म्हणून नोंद झाली आहे. यात बीड तालुक्यातील ४, गेवराई २, वडवणी २ आणि आष्टी, केज, धारूर, शिरूकासार येथील प्रत्येकी एकीचा समावेश आहे.**

### दोषी कोणाला धरायचे ?

**■ पालकांनीच मुलीचा बालविवाह लावलेला असतो. आता अल्पवयीन असतानाच गर्भवती राहिल्याने पीडितेने किंवा तिच्या आई-वडिलांनी तक्रार देणे अपेक्षित असते. परंतु, यात पालकही दोषी असतात. कारण त्यांनीच बालविवाह लावलेला असतो. त्यामुळे नेमका दोष कोणाला द्यायचा ? हा प्रश्न आहे.**

### इतर जिल्ह्यातून २३ गुन्हे वर्ग

**■ बीड जिल्ह्यात विवाह लावून परजिल्ह्यात कामासाठी अथवा इतर कारणांसाठी स्थलांतरित झालेल्या अल्पवयीन मुलींची तिकडे प्रसूती झाली. यावेळी डॉक्टरांनी अहवाल दिल्याने पतीविरोधात बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. तो गुन्हा नंतर बीडमध्ये वर्ग केला. २०२२ ते मार्च २०२५ या कालावधीत हा आकडा २३ आहे. यात पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, सातारा, अहिल्यानगर, नाशिक, जालना आदी जिल्ह्यांचा समावेश आहे.**

### बालविवाह कशावरून ?

**■ आरसीएच पोर्टलला नोंद करताना सर्व अधिकृत पुरावे द्यावे लागतात. यात पतीचाही पुरावा असतो. या सर्व १२ मुलींच्या नावापुढे त्यांच्या पतीचे नावही लिहिलेले आहे.**

### मग पुढील कारवाई

१८ वर्षांखालील मुलगी गर्भवती असेल किंवा प्रसूती झाली तर त्याचा अहवाल आपण पोलिसांना देतो. मग पुढील कारवाई ते करतात.

**- डॉ. संतोष शहाणे**
**अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, बीड.**

### तर आम्ही कारवाई करतो

अल्पवयीन मुलीसंदर्भात काही अहवाल आला तर आम्ही कारवाई करतोच. पण जोपर्यंत अहवाल येणार नाही, तोपर्यंत काही समजणार नाही.

**- नवनीत काँवत पोलिस अधीक्षक, बीड.**

# खा.बजरंग सोनवणे यांनी घेतली शिवराज दिवटेची रुग्णालयात भेट

» अंबाजोगाई | प्रतिनिधी

**बीड:** परळी तालुक्यातील अमानुष मारहाणीच्या घटनेत जखमी झालेला लिंबोटा येथील तरूण शिवराज दिवटे हा अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय रूग्णालयात उपचार घेत आहे. दि.१८ रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी त्याची रूग्णालयात जावून भेट घेत सर्व घटनाक्रम जाणून घेतला. शिवाय, घाबरू नको, मी सोबत आहे, असाही धीरही दिवटेला दिला. दरम्यान, गेल्या कांही वर्षात तयार झालेला परळी पॅटर्नचा बिमोड करण्यासाठी विशेष आयपीएस अधिकारी नेमून येथील गुंडगीरी मोडीत काढावी, अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

दोन दिवसांपुर्वी परळीतील अमानूष मारहाणीचा व्हिडीओ समोर आला होता. यात शिवराज टिवटे यास मारहाण करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात शिवराज दिवटे या तरूणावर उपचार सुरू आहेत. त्याठिकाणी जावून त्याच्या तब्येतीची विचारपूस केली आणि त्याला मिळत असलेल्या उपचाराबाबत संबंधित डॉक्टर व रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचेकडुन माहिती घेतली. दिवटे कुटूंबियांना धीर दिला. त्यानंतर केज-अंबाजोगाई रोडवर झालेल्या कंटेनर अपघातात जखमी झालेल्या रुग्णांचीही भेट घेतली. डॉक्टरांशी चर्चा करून सगळ्यांना योग्य ती वैद्यकीय मदत मिळतेय ना, याची खातरजमा केली. यावेळी बोलताना खा.सोनवणे म्हणाले, परळी व परिसरात दहशतीचा धंदा निर्माण करण्याकडे नवतरुणांचा कल वाढत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे थांबवायचे असेल तर कायद्याचे राज्य स्थापण होणे गरजेचे आहे. या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एक स्वतंत्र आयपीएस अधिकारी नेमण्यात यावा, परळीतील सर्वच वादग्रस्त पोलिस अधिकारी यांच्या तातडीने बदल्या कराव्यात, शिवराज दिवटे प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोरात कठोर शासन करावे, अशा मागण्या राज्य सरकारकडे करत आहे. तर दिवटे परिवाराला पोलिस संरक्षण देण्यात यावे. त्यांना रूग्णालयातही धमकावण्याचे काम सुरू आहे. त्याकडे पोलीस प्रशासनाने गांभिर्याने पहावे अशी मागणी केली. राज्य सरकारकडे करण्यात आलेल्या मागण्या आज संध्याकाळपर्यन्त मान्य कराव्यात, अन्यथा बीड जिल्हा उद्या बंद करण्यासाठी जिल्हा बंदची हाक देण्यात येईल, असा इशाराही यावेळी खा.सोनवणे यांनी दिला. याच बरोबर बीड जिल्ह्यामध्ये जे चाललंय ते अत्यंत दुर्दैवी आहे. बीड जिल्ह्यात अनेक घटना घडतात की या गुन्ह्यांची पाळेमुळे परळीतील विशिष्ठ लोकांच्याकडे सापडतात. अतिशय वाईट कृत्य करणारे तरुण परळी शहरात आणि परिसरात तयार होत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. स्व. संतोष देशमुख यांचे ज्या दिवशी अपहरण आणि मर्डर झाला त्या दिवसापासून मी संसदेत व बाहेर आवाज उठवत आहे. सर्व आमदार आणि सामाजिक कार्यकर्ते बोलत आहेत, मात्र या गुंड प्रवृत्तीला रोखण्यासाठी पोलिसांनी क्रियाशील पुढाकार घ्यायला हवा, असेही खा.सोनवणे म्हणाले.



परळीतील गुंडगिरीवर कठोर कारवाईची मागणी

### सत्तेने मस्तावलेली प्रवृत्ती

**■ परळी पॅटर्नसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आयपीएस लेव्हलचा एक विशेष अधिकारी नेमण्यात यावा अशी मागणी करणार आहे.परळी मध्ये १९९२ पासून सत्तेने मस्तावलेली प्रवृत्ती आहे. सत्तेचा राजाश्रय मिळत असल्याने हे लोक दादागिरी आणि गुंडगिरी करीत आहेत.**

### बोगस पिकविमा उचलण्यातही हेच लोक

**■ बोगस पिकविम्याचे लाखो नव्हे तर करोडो रुपये काही धेंडानी उचलले आहेत. नांदेड, लातूर, परभणी अशा चारपाच जिल्ह्यात बोगस पीकविमा भरला आहे. याची सर्वांकडे ऑफलाईन पद्धतीने तक्रार केलेली आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी बीड जिल्ह्याच्या गृहखात्यावर आणि जेल प्रशासनावर बोलले पाहिजेत. बीडचे जेल प्रशासन हे जास्तच बोगस प्रशासन आहे, याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.**

# साकत घाटात मालट्रक पलटी, किन्नरचा मृत्यू ; चालक थोडक्यात बचावला

## सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांची अपघातातील लोकांना मदत

» जामखेड | प्रतिनिधी

रविवारी सकाळी आठ वाजता दहा टायर मालट्रक (क्रमांक एम एच १०डी टी ६३२१ ) मका घेऊन चिखली (जिल्हा जालना) येथून बारामती ला जात असताना जामखेड जवळील साकत घाटामध्ये पलटी होण्याचा अंदाज दिसल्या बरोबर मालट्रकचा चालक आणि किन्नरने उडी घेतली. मात्र किन्नरने ज्या बाजुने उडी मारली बरोबर त्याचबाजुने मालट्रक पलटी झाल्याने गाडीच्या खाली किन्नर दबला गेल्याने त्याचा जागीच मृत्यु झाला. सुमित ताराचंद राठोड ( वय ३१) (राहणार मठतांडा तालुका अंबड जिल्हा जालना ) असे मृत किन्नर चे नाव असून, ड्रायव्हर केवळ शांतीलाल चव्हाण ( मठतांडा तालुका अंबड जिल्हा जालना) हा बाल बाल बचावला आहे. मका पोत्यांच्या ढिगा-याखाली आलेल्या किन्नरचा प्रारंभी लवकर शोध लागला नाही.मात्र पोते बाजुला हवल्यानंतर किन्नरचा शोध लागला.



दरम्यान घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना मिळाल्याबरोबर कोठारी त्यांनी दीपक भोरे, विशाल ढवळे या सहकार्यांना समवेत घेत रूग्णवाहिका घेवुन,तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावरील हरिभाऊ मुरूमकर , नय्युम पठाण,काका मुरूमकर, बाबू सुपेकर, विशाल जोगदंड ,अविनाश कदम, महेश मोहळकर व या रस्त्यावरून जाणा-या लोकांनी किन्नरला बाहेर काढण्यात मदत केली. सामाजिक कार्यकर्ते कोठारी यांनी मृतदेह रूग्णवाहिकेतून जामखेड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केला. वैद्यकीय अधीक्षक डॉ मनोज शिंदे यांनी तपासणी करून मृत घोषित केले. सदर घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना दिली.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक सचिन मनोहर पवार, यांनी मिनाक्षी प्रिंट्स, कुसळंब ता. पाटोदा जि. बीड - 413207 येथे छापून साप्ताहिक दिव्यवास्तव कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज चौक कुसळंब, ता. पाटोदा जि. बीड - 413207 (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक सचिन मनोहर पवार मो. 9921801919, Email.divyavastav19gmail.com THIS NEWSPAPERS IS PRINTED, PUBLISHER, OWNED BY SACHIN MANOHAR PAWAR, AT Meenakshi PRINTERS,KUSLAMB TQ.PATODA DIST.BEED AND PUBLISHED AT THE OFFICE WEEKLY DIVYA VASTAV, CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ CHOWK KUSLAMB, TQ.PATODA DIST.BEED - 413207 (MAHARSTHRA).Mob.9921801919, Email.divyavastav19gmail.com

# विक्रीला काढलेल्या गावाला तहसीलदारांची भेट

## मोबाईल टॉवर,रस्ता याबाबतीचा घेतला आढावा



» आष्टी | प्रतिनिधी

गावात मुलभुत सुविधा नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे पाहून, संपुर्ण गावाने ठराव घेत गावच विक्रीला काढल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या.याची दंगल घेत आष्टी च्या तहसिलदार वैशाली पाटील यांनी सरपंच व गावकऱ्यांची भेट घेऊन गावचे प्रश्न तात्काळ सोडविण्यासाठी पुढाकार घेऊन गावाला सुविधा पुरविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

याबाबत अधिक माहिती अशी आष्टी तालुक्यातील मौजे वनवेवाडी या गावाने गावच विक्रीला काढल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या.त्या अनुषंगाने:शनिवार (दि.१७) रोजी सकाळी साडेदहा वा.तहसीलदार आष्टी वैशाली पाटील यांनी स्वतःगावात जाऊन गावातील सरपंच ग्रामपंचायत सदस्य व इतर गावकरी यांच्याशी चर्चा केली.यामध्ये प्रामुख्याने गावातील रस्ता याची मागणी व मोबाईलला रेंज नसल्यामुळे मोबाईल टॉवरची मागणी गावकऱ्यांनी केलेली आहे.मोबाईल टॉवरच्या संदर्भात बीएसएनएल च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची संपर्क साधून याबाबत तांत्रिक बाबी तपासून पुढील निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आलेले आहे.वनवेवाडी बीड-नगर या राष्ट्रीय महामार्गावरून गावात जाणारा अंदाजे तीन किलोमीटर चा रस्ता हा दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून अरुंद केलेला आहे. यामुळे रस्त्यावरून चालणेही अवघड झाले आहे. सध्या सरळ रस्ता दुरुस्तीबाबत प्रस्ताव जिल्हा परिषद बांधकाम यांच्याकडे पाठवलेला आहे. त्यांच्याकडून ही निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यानंतर रस्ता होणार आहे. परंतु रस्त्यावर दोन्ही बाजूने अतिक्रमण झाल्यामुळे अरुंद रस्ता झाला आहे.आज रोजी एकही वाहन त्यामधून जाऊ शकत नाही. तसेच लहान मुले शाळेला जाताना त्यांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे.आज आहे त्या स्थितीत रस्ता झाल्यास भविष्यात वनवेवाडी ग्रामस्थांच्या अडचणीत भर पडणार असल्याने पूर्वी असलेला चाळीस फुटाचा रस्ता करून द्यावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली.याबाबत याबाबत पुढील आठवड्यात मोजणी करून मोजणी अंती अतिक्रमण काढण्यात येईल व त्यानंतर आपला रस्ता होईल असे सर्व ग्रामस्थांना आश्वासित करण्यात आलेले आहे याकरिता वनवेवाडी ग्रामपंचायत वनवेवाडी ग्रामस्थ या सर्वांचीच प्रशासनाला मदत भासणार आहे.अतिक्रमण काढत असताना अतिक्रमणाची कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात येईल परंतु यासाठी लागणारे साधन सुविधा ग्रामपंचायत वनेवाडी यांनी तयार ठेवावी असे सांगण्यात आले असल्याचे तहसिलदार वैशाली पाटील यांनी सांगितले.

## उन्हाळी कबड्डी प्रशिक्षण व आगामी पोलीस भरतीसाठी फिटनेस शिबिर

» बीड | प्रतिनिधी



बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा संकुलन बीड येथे उन्हाळी कबड्डी प्रशिक्षण व आगामी पोलीस भरतीसाठी फिटनेस शिबिर सुरू करण्यात आले आहे या शिबिराचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान राष्ट्रीय खेळाडू नितीन गर्जे यांनी केले आहे.

जय बजरंग कबड्डी अकॅडमी बीड आयोजित उन्हाळी कबड्डी प्रशिक्षण व आगामी पोलीस भरतीसाठी फिटनेस शिबिर आयोजित करण्यात आले आहे. जिल्हा क्रीडा संकुलन बीड येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये निवासी अनिवासी राहण्याची व्यवस्था, नवीन खेळाडूंसाठी मोफत किट व ट्रॅक सूट, मुलींसाठी स्वातंत्र्य बॅच, प्रो कबड्डी खेळाडूंचे वेळोवेळी मार्गदर्शन, प्रो कबड्डी व राष्ट्रीय स्तरावरील शालेय गटांसाठी संघ तयार करण्यात येईल, करिअर विषयक मार्गदर्शन, कबड्डीचे तंत्रशुद्ध मार्गदर्शन, शालेय गटांसाठी संघ तयार करण्यात येईल इत्यादींचा सहभागीय शिबिरामध्ये असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान राष्ट्रीय खेळाडूंनी दिनकर यांनी केले आहे अधिक माहितीसाठी 9763876742 या नंबर वर संपर्क करून अधिक माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## युवकास जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण

### दिंद्रुड पोलिसात अ‍ॅट्रॉसिटी ऍक्ट नुसार गुन्हा दाखल

» बीड | प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील लोनगाव पुनर्वसन वस्ती येथील युवकास जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करण्यात आल्यामुळे आरोपीविरोधात दिंद्रुड पोलीसात अ‍ॅट्रॉसिटी दाखल करण्यात आली आहे.

लोनगाव पुनर्वसन वस्ती येथील अमोल मुंजा आलाट हा शुक्रवारी सायंकाळी ४ वाजे दरम्यान घरी हेडफोन गळ्यात घालून बसलेला असतांना विशाल सर्जेराव मेंढके हा तेथे येवून तु हेडफोन का वापरतो म्हणत जातीवाचक शिवीगाळ करत कोयत्याने वार केला.सायंकाळी अमोल आलाट हा मारोती मंदिरासमोर गेला असता विशाल सर्जेराव मेंढके सह तिन अनोळखी आरोपींनी चापटाबुक्क्यांनी व दगडांनी अमोल आलाट यास मारहाण करत जखमी केले.

अमोलला पात्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार्थ शुक्रवारी दाखल करण्यात आले होते.दिंद्रुड पोलीसात अमोल मुंजा आलाट यांच्या फिर्यादीवरून चौघांवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम (अ‍ॅट्रॉसिटी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस उपअधीक्षक अनिल चोरमले तपास करीत आहेत.सर्व आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

**गुन्हेगारी आवळण्यासाठी प्रयत्न करा**

- **बीड जिल्ह्यात शुक्रवारी मारहाणीच्या दोन घटना घडल्या आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून पालकमंत्री अजित पवार यांनी गुन्हेगारी आवळण्यासाठी बीड जिल्ह्यावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आरोपीस तात्काळ अटक न केल्यास डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल.**
- **– नवनाथ कांबळे**
- **डी.पी.आय. जिल्हाध्यक्ष बीड.**





## पाटोदयात कुस्तीचा रंगला कुस्त्यांचा आखाडा!

» पाटोदा | प्रतिनिधी

जय हनुमान तालीम यांच्या वतीने पाटोदा येथे पार पडलेल्या भव्य कुस्ती दंगलीत रंगलेल्या दमदार झुंजींनी कुस्तीप्रेमींना अक्षरशः भारावून टाकले. नामवंत पैलवानांनी सहभाग घेतलेल्या या कुस्ती स्पर्धेत अखाड्यात एकापेक्षा एक जोरदार लढती रंगल्या.या भव्य कुस्ती फडाला ह.भ.प. रंधवे बापू महाराज, आमदार सुरेश धस,माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला अधिकच भारदस्त स्वरूप प्राप्त झाले.

कुस्ती संपल्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचे व पाहुण्यांचे स्वागत व आभार जय हनुमान तालीमचे प्रमुख वस्ताद पैलवान बाळासाहेब आवारे यांनी केले. त्यांनी कुस्ती ही केवळ ताकदीची नव्हे, तर शिस्त, संयम आणि संस्कारांची शाळा असल्याचे नमूद केले. अखेरपर्यंत रंगतदार झालेल्या या कुस्ती दंगलीत प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत पैलवानांचे कौतुक केले. पारंपरिक खेळांची गोडी आणि गावागावात त्याचा ठसा जपण्याचे कार्य जय हनुमान तालीम करत असल्याचे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे पुरस्कार जाहीर

### ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांना पुरस्कार

» सिंधुदुर्ग | वृत्तांत

भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने देण्यात येणारा "आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार" यंदा ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना तर नागोजीराव दुधगावकर पुरस्कार बीडचे दैनिक सुराज्यचे ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांना देण्यात येत असल्याची घोषणा परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली. यावेळी एस.एम.देशमुख यांनी परिषदेचे अन्य पुरस्कार देखील जाहीर केले आहेत.

अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी विविध पुरस्कारांनी राज्यातील पत्रकारांना सन्मानित केले जाते.. 2024 च्या पुरस्कारांची आज घोषणा करण्यात आली.. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.. 25, 000 रूपये रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.. यापुर्वी हा पुरस्कार मा. गो. वैद्य, दिनू रणदिवे, पंढरीनाथ सावंत, प्रकाश जोशी आदि मान्यवर पत्रकारांना देण्यात आला आहे..जुलैच्या पहिल्या आठवड्यात मुंबईत हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होत आहे.. परिषदेच्यावतीने इतरही पुरस्कार दिले जातात..परिषदेचे माजी अध्यक्ष आचार्य अत्रे पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे यांना जाहीर झाला आहे.. इलेक्ट्रॉनिक मिडियासाठीचा शशिकांत सांडभोर पुरस्कार अभिजित करांडे यांना दिला जात आहे.. प्रमोद भागवत स्मृती पुरस्कार अमेय तिरोडकर यांना, भगवंतराव इंगळे स्मृती पुरस्कार अंमळनेर येथील पत्रकार पांडुरंग पाटील यांना, नागोजीराव दुधगावकर पुरस्कार बीड येथील सुराज्य दैनिकाचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांना, दत्ताजीराव तटकरे स्मृती पुरस्कार गोवा सकाळचे संपादक दिनेश केळुसकर यांना महिला पत्रकारांसाठी असलेला सावित्रीबाई फुले पत्रकारिता पुरस्कार सिंधुदुर्ग येथील सीमा मराठे यांना जाहीर करण्यात आला आहे.. कृषी क्षेत्रातील पत्रकारांसाठी यावर्षी पासून माणिकराव देशमुख कृषी पत्रकारिता पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.

तो अ‍ॅग्रोवनचे पत्रकार बाळासाहेब पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे..मराठी पत्रकार परिषदेचे प्रसिध्दीचे काम उल्लेखनीय करणारया राज्यातील प्रसिद्धी प्रतिनिधींना दिला जाणारा संतोष पवार स्मृती पुरस्कार यंदा पुणे येथील भरत निगडे यांना जाहीर करण्यात आला आहे.. एस.एम.देशमुख यांनी सर्व पुरस्कार प्राप्त पत्रकारांचे अभिनंदन केले आहे.. आज बाळशास्त्री जांभेकर यांची 179 वी पुण्यतिथी होती.. त्यानिमित्त बाळशास्त्री जांभेकर स्मारकात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.. तसेच अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची त्रैमासिक सभा देखील आज बाळशास्त्री जांभेकर स्मारक सिंधुदुर्ग येथे पार पडली त्यावेळी या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली..यावेळी परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, माजी अध्यक्ष गजानन नाईक, सिंधुदुर्ग जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश तोरसकर, गणेश जेठे आदि उपस्थित होते. संपादक गावरस्कर यांना नागोजीराव दुधगावकर पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांचे विभागीय सचिव रवी उबाळे ,समन्वयक सुभाष चौरे ,कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, संपादक राजेंद्र होळकर, संपादक राजेंद्र आगवान, संपादक दिलीप खिस्ती, परिषदेचे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक दत्ता आंबेकर, समन्वयक अभिमन्यू घरत,तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे आदींनी अभिनंदन केले.

## आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी : धनंजय मुंडे

### शिवराज दिवटे घटनेत जाती धर्माचा संबंध नाही

» अंबाजोगाई प्रतिनिधी



परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.

शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे यांच्याकडून माहिती घेतली. शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, शिवराजला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील.

तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले.

### प्रेम भक्ती साधना केंद्राच्या वतीने दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**परळी वै.:** यावर्षी इयत्ता दहावी मध्ये भरघोस यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा परळी येथील प्रेमभक्ती साधना केंद्राच्या वतीने आज सत्कार करण्यात आला. कु. अक्षरा सुनील घुले ९६% श्वेता विजय सावंत ९४% गौरी आदिनाथ मुंडिक ९४% अक्षरा रवींद्र दहिवाळ ८७% मनोज भागवत मुंडिक ९२% यांचा यावेळी सत्कार करण्यात आला .




## शिवस्मारकासाठी शिवप्रेमी आक्रमक!

### ग्रामपंचायत समोर अजय काळे यांचे आमरण उपोषण सुरू

» नेकनूर | प्रतिनिधी

शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे अक्षरूढ स्मारक उभारण्यासाठी नेकनूर ग्रामपंचायत मार्फत जागा देण्यात यावी या मागणीसाठी नेकनुरकर आक्रमक झाले आहेत (दि.१७) शनिवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून अजयसिंह काळे हे या मागणीसाठी उपोषणास बसले आहेत.

बीड तालुक्यातील नेकनूर शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचे अक्षरूढ स्मारक उभारण्यासाठी नेकनूर ग्रामपंचायत मार्फत जागा देण्यात यावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय बीड व नेकनूर ग्रामपंचायत कार्यालय यांना वेळोवेळी पत्र व्यवहार करूनही स्मारक उभारण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्यामुळे अजयसिंह भारतराव काळे हे व समस्त शिवप्रेमी नागरिक ग्रामपंचायत कार्यालयासमोर (दि.१७) शनिवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून या मागणीसाठी उपोषणास बसले आहेत. अजूनपर्यंत ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी उपोषणस्थळी भेट दिली नाही.

**जागा देत नाही तोपर्यंत...**

आज सकाळी 10 वाजता उपोषणास सुरुवात केली आहे जो पर्यंत ग्रामपंचायत प्रशासन जागा देत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही.

- अजयसिंह भारतराव काळे

## शिवराज दिवटेंवरील हल्लेच्या निषेधार्थ लिंबोटी येथे रस्ता रोको आंदोलन



### आरोपींना तात्काळ शिक्षा झालीच पाहिजे,असा ठाम निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला

» परळी | प्रतिनिधी

तालुक्यातील लिंबोटा येथील रहिवासी शिवराज दिवटे यांच्यावर झालेल्या अमानुष हल्ल्याच्या निषेधार्थ आणि आरोपींवर कडक कारवाईची मागणी करण्यात येत आहे. रविवारी पहाटे 6 वाजल्यापासून परळी बीडमार्गावरील लिंबुटा (गोपीनाथगड) येथील श्री संत भगवान बाबा चौकातगावकऱ्यांनी तीन तास रस्ता रोको आंदोलन छेडले.

या आंदोलनात लिंबोटा, पांगरी, देशमुख टाकळी, कौठळी, तांडा, लिंबुटा तांडा, पांगरी तांडा या गावांतील नागरिक, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. गावचे मार्गदर्शक, नेते फुलचंद कराड यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन शांततापूर्ण पद्धतीने पार पडले. लिंबोटा येथील शिवराज दिवटे यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत गुन्हा दाखल करावा, जलदगतीने न्याय द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.आरोपींना तात्काळ शिक्षा झालीच पाहिजे,असा ठाम निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे. स्थानिक पोलीस प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी घटनास्थळी बंदोबस्त तैनात केला होता. रास्ता रोको आंदोलनामुळे काही तास वाहतूक ठप्प झाली होती.